# पुणे विद्यापीठ

दुरध्वनी ०२० - २५६०११९७
०२० - २५६०११२०
फॅक्स ०२० - २५६९७३८८

गणेशखिंड
पुणे ४११ ००७
E.mail: election@unipune.ac.in

संदर्भ- पुविनि/ ९६८

दिनांक - ०९.०१.२०१०

प्रति,
मा. अध्यक्ष / मा. सचिव,
सर्व संलग्न महाविद्यालये व
मान्यताप्राप्त संस्थांचे व्यवस्थापन मंडळ

विषय : महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाच्या प्रतिनिधीसाठी पुणे विद्यापीठ अधिसभेवर आठ जागा आणि विद्यापरिषदेवर दोन जागांसाठी निवडणुकीकरिता मतदार यादी तयार करणेबाबत.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५(२) (एम) अन्वये अधिसभेवर आठ (८) प्रतिनिधी आणि कलम २९(२) (एन) अन्वये विद्यापरिषदेवर दोन (२) प्रतिनिधी याप्रमाणे महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थांच्या व्यवस्थापन मंडळाच्या प्रतिनिधींना प्रतिनिधीत्व देण्यात आलेले आहे. यासंबंधीच्या तरतुदी खालीलप्रमाणे उध्दृत करण्यात येत आहेत.

**Defination**

Section 2 (20) : "Management" means the trustees or the managing of governing body, by whatever name called, of any trust registered under the Bombay Public Trusts Act, 1950 (or any society registered under the Societies Registration Act, 1860 ) under the management of which one or more colleges of recognized institutions or other conducted and admitted to the privileges of the university.

Provided that, in relation to any college or institution established or maintained by the Central Government or the State Government or a local authority like a *zilla parishad*, municipal council or municipal corporation, it means, respectively, the Central Government or the State Government or *Zilla parishad* or the municipal council or the municipal corporation, as the case may be;

Senate

Section 25(2)(m): (eight) representatives of the managements of affiliated colleges or recognized institutions elected by the electoral college consisting Chairman or President or the representative of the Managements as the management may recommend. Where a management conducts one or more colleges or institutions only one Chairman or President or representative of such management as the case may be, shall be the member of the electoral college:

Provided that, out of the eight representatives, two shall be women and one shall be a person belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes or Denotified Tribes (*Vimukt Jatis*)/ Nomadic Tribes or Other Backward Classes, by rotation;

**Academic Council**

Section 29(2)(n) : two representative of the managements, elected by the electoral college, consisting of the President, Chairman or a nominee of each management from amongst themselves. Where the management conducts more that one college or recognized institutions, only one nominee of the management shall be a member of the electoral college.

या तरतुदींना अनुसरुन आपल्या संस्थेचे अध्यक्ष किंवा सचिव किंवा व्यवस्थापनाच्या एका प्रतिनिधीची माहिती विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नमून्यामध्ये online पध्दतीने सादर करावी. तसेच त्या माहितीची छापील प्रत व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या प्रतिसह विद्यापीठ कार्यालयाकडे बुधवार दिनांक १७ मार्च, २०१० पुर्वी पोहोचेल अशा रितीने पाठवावी. आवश्यकता भासल्यास खास दुताकरवी माहिती पाठवावी. ठरावाच्या प्रतीवर व्यवस्थापनाच्या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षांची आणि सचिवांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. वरील तारखेनंतर आलेली माहिती, अपुर्ण माहिती व माहिती विहित नमुन्यात नसल्यास विचारात घेतली जाणार नाही आणि त्यातील नावाचा मतदार यादीमध्ये समावेश केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

आपणास पुढे असेही कळविण्यात येते की, व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीने त्यांचा **e-mail id** वरील माहिती सोबत देणे आवश्यक आहे. ज्यांच्याकडे तो नसेल त्यांनी खालीलपैकी एखादया संकेत स्थळामार्फत स्वतःचा **e-mail id** उपलब्ध करुन घ्यावा.

www.yahoo.com, www.hotmail.com, www.gmail.com.

याबाबत काही शंका/अडचणी असल्यास विद्यापीठाच्या निवडणूक विभागास election@unipune.ac.in या **e-mail-id** वर संपर्क साधावा.

या संदर्भात पुढे असेही कळविण्यात येते की, एकदा मतदार यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यामध्ये फक्त वर निर्देश केलेल्या तारखेपुर्वी कळविलेल्या नावात दुरुस्ती किंवा कळविलेल्या नावामध्ये काही नावे मतदार यादीतून वगळली गेली असल्यास किंवा कळविलेल्या नावामध्ये चुकीच्या नोंदी झालेल्या असल्यास व त्या संबंधित संस्थेने किंवा संबंधित प्रतिनिधीने विहीत मुदतीत कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दुरुस्तीबाबत विचार केला जाईल. मात्र वरील मुदतीनंतर नव्याने नावे कळविल्यास अशा नावांचा समावेश मतदार यादीत केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

(डॉ. माणिक जाधव)
कुलसचिव

D:Computer2:Election:Adhisabha